# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक १०६ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१५६८ : सम्राट अकबर बादशहाने रजपुतांचा प्रचंड पराभव करुन चित्तोडगड ताब्यात घेतला.

१८८६ : भगवंत भक्त संत एकनाथ महाराजांनी पैठण येथे आजच्या दिवशी समाधी घेतली.

१९८८ : संपूर्ण भारतीय बनावटीच्या पृथ्वी या क्षेपणास्त्राची श्रीहरिकोटा या केंद्रावर यशस्वी चाचणी.

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८२,३१९.८९ -९७४.७७ (१.१७%) |
| डॉलर | ₹ ९०.९३ |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३५ | १९ |
| दिल्ली | २९ | १५ |
| मुंबई | ३३ | २२ |
| नागपूर | ३२ | १८ |
| पुणे | ३३ | १६ |

**सुविचार**

आयुष्य हे संगीतासारखे आहे; कधी सुर ताल मिळवावा लागतो, तर कधी नवीन धुन शोधावी लागते.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:५१ संध्या-६:३१

**सोने - चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६२,४७०/- २,८५,०००/-

**केळी भाव**


नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# ‘डिजिटल अरेस्ट’ हा निव्वळ खोटेपणा

## मुख्यमंत्री फडणवीसांनी विधानसभेत स्पष्ट केली भूमिका!; तुम्हाला फोन आला की लगेच १९३० नंबर वर कॉल करा

वृत्तसंस्था । मुंबई

**देशात ‘डिजिटल अरेस्ट’च्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. मोठ्या संख्येने लोक याला बळी पडत असून त्यांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक होत आहे. या घटना टाळण्यासाठी राज्य सरकारने पावलं उचलली पाहिजेत, तसंच जनजागृतीची व्याप्ती वाढवली पाहिजे, अशी मागणी आज आमदार अबू आझमी यांनी आज विधानसभेत केली. त्यांच्या या प्रश्नावर राज्यमंत्री योगेश कदम यांनी उत्तर दिलं असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याबाबत सखोल माहिती दिली.**

मुंबई आणि अहिल्यानगरसारख्या शहरातील नागरिक डिजिटल अरेस्टला बळी पडत आहेत. त्यांची आयुष्याची जमापुंजी अशा लुटारुंच्या हाती द्यावी लागत आहे. या सायबर आरोपींविरोधात कारवाई करावी आणि जनजागृती करावी, असं अबू आझमी आज सभागृहात म्हणाले. त्यावर, केंद्र आणि राज्य सरकारकडून जनजागृती मोठ्याप्रमाणात सुरू आहे. सायबर फसवणुकीला बळी पडल्यानंतर तत्काळ तक्रार केल्यास तक्रारीचं निवारण करता येतं आणि जास्तीत जास्त पैसे रिकव्हर करता येतात, असं राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले.

**डिजिटल अरेस्ट असा प्रकारच नाही : मुख्यमंत्री**

या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही भाष्य केलं. ते म्हणाले, राज्यमंत्र्यांनी योग्य उत्तर दिलंय. या सभागृहातील चर्चा राज्यभरात जातेय म्हणून मी ही संधी घेतोय. या माध्यमातून या सभागृहातील सदस्यांना आणि राज्यतील नागरिकांना सांगतो की, ‘डिजिटल अरेस्ट’ असा प्रकारच नाही. कायद्याने कोणालाही डिजिटल अरेस्ट करता येत नाही. त्यामुळे तुम्हाला कोणी डिजिटल अरेस्टचा फोन केला किंवा व्हिडिओ कॉल केला तर पहिल्याच क्षणी समजून घ्या की हा फ्रॉड आहे. १०० टक्के हा फ्रॉड आहे.

**डिजिटल अरेस्ट करताच येत नाही**

कोणत्याही कायद्यान्वये कोणीही कोणाला डिजिटल अरेस्ट करू शकत नाही. तुम्हाला एक फोन येतो, व्हिडिओ कॉल येतो, त्यावर समोर बसलेला माणूस स्वतःला सीबीआयचा, पोलिसांचा अधिकारी सांगतो. मग तिथून तो म्हणतो की तुम्ही पार्सल मागवलं होतं का? त्यात ड्रग्स सापडले आहेत. तुम्हाला जागचं हलण्यासही परवानगी दिली जात नाही. तुम्हाला स्क्रीनपुढेच राहायला सांगितलं जातं. त्यातून सुटण्याकरता तुम्हाला पैसे पाठवण्याची मागणी केली जाते. मग सामान्य माणूस घाबरून पैसे ट्रान्स्फर करतो, अशी प्रक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी डिजिटल अरेस्टची सांगितली. डिजिटल अरेस्ट प्रकरणात फक्त सामान्य माणूस नाहीतर अनेक मोठे अधिकारी, निवृत्त अधिकारीही अडकले जातात, असंही फडणवीस म्हणाले. ‘पीडितांनी पैसे पाठवले की ते पैसे वेगवेगळ्या खात्यांमध्ये तत्काळ ट्रान्सफर केले जातात, मग ते विदेशातील खात्यांतही पाठवले जातात. अनेक प्रकरणात असं लक्षात (पान २ वर)

**➤ गोल्डन अवरमध्ये तक्रार दाखल करा**

**कोणालाही डिजिटल अरेस्ट करता येत नाही. जर तुम्हाला असा फोन आला तर थेट त्याच क्षणी १९३० या नंबरवर कॉल करा. हा सायबरचा नंबर आहे. मोठी व्यवस्था उभी आहे. तुम्हाला असा फोन आला किंवा तुमचे यात पैसे गेले तर सुरुवातीच्या पहिल्या तासांत म्हणजेच गोल्डन अवर १९३० क्रमांकावर तक्रार नोंदवली तर तुमचे पैसे रिकव्हर केले जातील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.**

बीएलओचे काम कायमस्वरुपी रद्द होणार?

# अशैक्षणिक कामांतून शिक्षकांना मिळणार दिलासा?

## शालेय शिक्षण राज्यमंत्री भोयर यांची घोषणा

वृत्तसंस्था । मुंबई



**शिक्षकांना परिक्षांच्या काळात मतदान नोंदणी कर्मचारी (बीएलओ) म्हणून काम करण्याची सक्ती केली जाणार नाही. त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जाणार नाहीत. शिक्षकांकडील बीएलओचे काम कायमस्वरुपी रद्द करण्यासाठी सर्वपक्षीय बैठक घेण्यात येईल, अशी ग्वाही शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली.**

विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात विक्रम काळे, अभिजित वंजारी, ज्ञानेश्वर म्हात्रे, सतिश चव्हाण, किरण सरनाईक, राजेश राठोड आदींनी शिक्षकांवरील अशैक्षणिक कामाचा प्रश्न उपस्थित केला. शिक्षकांवर अशैक्षणिक कामाचे ओझे कमी करा. शिक्षकांना भटक्या कुत्र्यांची मोजणी करा. नसबंदी केलेल्या कुत्र्यांची मोजणी करा, असे आदेश दिले जातात. शिक्षकांना वर्षभर बीएलओचे काम करण्याची सक्ती केली जाते. त्यामुळे शाळांमधील शिक्षणाच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत आहे. ऐन परिक्षांच्या काळात बीएलओच्या कामाची सक्ती केली जाते. त्यामुळे शिक्षकांकडील बीएलओचे काम कायमस्वरुपी रद्द करा, अशी एकमुखी मागणी सर्व सदस्यांनी केली. पण, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शिक्षकांकडे निवडणुकीच्या संदर्भातील कामे दिली जातात. निवडणूक काळात बीएलओचे काम दिले जाणार नाही. तसेच बीएलओचे काम कायमस्वरुपी रद्द करण्यासाठी सर्वपक्षीय आमदारांची बैठक घेण्यात येईल. त्या शिवाय शिक्षकांकडील सर्व अशैक्षणिक कामे. समूहिक सुविधा केंद्र किंवा सेतूच्या माध्यमातून करण्याबाबत चाचपणी केली जात आहे. त्या बाबतचा निर्णय लवकरच घेतला जाईल. शिक्षकांकडील सर्व अशैक्षणिक कामे रद्द करण्याचा निर्णय लवकरच घेतला जाईल, असे मंत्री पंकज भोयर यांनी सांगितले.

**थोडक्यात**

### पाकचा पंजाबला अस्थिर करण्याचा कट

**चंदिगड ।** पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया यांनी मंगळवारी एका गंभीर आरोपाद्वारे खळबळ उडवून दिली आहे. सीमेपलीकडून पंजाबमध्ये ड्रोनद्वारे होणारी अमली पदार्थ आणि शस्त्रास्त्रांची तस्करी केवळ पाकिस्तानचे काम नसून, यामध्ये मोठ्या परकीय शक्तींचा सहभाग असल्याचा दावा त्यांनी केला आहे. राज्याला अस्थिर करणे आणि तरुणाईला अंमली पदार्थांच्या जाळ्यात ओढणे हा यामागचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



### ‘आरएसएस’ची प्रतिनिधी सभा १३ मार्चपासून

**समलखा ।** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची (आरएसएस) अखिल भारतीय प्रतिनिधी सभा या वर्षी १३, १४ आणि १५ मार्च २०२६ रोजी हरियाणातील समलखा येथे आयोजित केली जात आहे. संघाच्या दृष्टिकोनातून, ही बैठक सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था आहे. ही वार्षिक बैठक यावर्षी ग्रामविकास आणि सेवा साधना केंद्र, पट्टी कल्याण, समलखा, हरियाणा येथे आयोजित केली जात आहे. या वर्षी संघाचे शताब्दी वर्ष असल्याने, या बैठकीत विजयादशमी उत्सव, घरगुती संपर्क, हिंदू परिषदा, युवा परिषदा, प्रमुख नागरिक बैठका आणि सामाजिक सलोखा बैठका यासारख्या शताब्दीनिमित्त आयोजित कार्यक्रम आणि मोहिमांमधील अनुभव आणि अहवालांवर विशेषतः चर्चा केली जाईल. प्रतिनिधी सभा गेल्या वर्षातील, २०२५-२६ च्या संघाच्या कार्याचा आढावा घेईल.

# राज्यात कर्करोगावर मात करण्यासाठी टाटा सारखी १०० पेक्षा जास्त रुग्णालये उभी करावी लागतील

## आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची विधानसभेत माहिती

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यात कर्करोगाच्या रुग्णांचे प्रमाण वाढले आहे. त्यासाठी १०० पेक्षा जास्त टाटा सारखी रुग्णालय उभी करावी लागतील. या आजारावर मात करण्यासाठी राज्य शासनाने तीन स्तरावर आरोग्य रचना उभी करण्याचे ठरविले आहे. अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत दिली.**

राज्यात कॅन्सरची संख्या वाढली आहे. त्यासाठी २६ ठिकाणी रेडिओथेरपी निर्माण केल्या जातील. कॅन्सरच्या पेट स्कॅन तसेच औषधसुविधांचा महात्मा फुले जन आरोग्य सेवेत समावेश केला जाईल. असे आबिटकर यांनी सांगितले.



राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाने गेल्या वर्षी राबवलेल्या कॅन्सर तपासणी मोहिमेत १६७७ कॅन्सर रुग्ण आढळून आले आहेत. मुंबई शहरातील वाढते प्रदूषण हे फुफुसाच्या कॅन्सर साठी कारणीभूत ठरू लागले आहे. फुफ्फुसाच्या कर्करोगांचे प्रमाण ५७% निवडले आहे. निदान झालेल्या रुग्णांमध्ये मुख, गर्भाशय, आणि स्तन कॅन्सर झालेल्या रुग्णांची संख्या आहे. महिलांमध्ये स्तन कॅन्सरचे प्रमाण चिंताजनक आहे. त्यामुळे शासनाने टाटा सह खाजगी व शासकीय रुग्णालयांना कॅन्सर उपचारासाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी लक्षवेधी शिवसेना ठाकरे (पान २ वर)

# आझाद मैदानावर कोळी समाजाचे आमरण उपोषण

## मुख्यमंत्र्यांनी ‘१२ वर्षांपूर्वी दिलेला शब्द पाळावा’

वृत्तसंस्था । मुंबई

**महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट असलेल्या आदिवासी टोकरे, ढोर, मल्हार, महादेव व डोंगर कोळी समाजाच्या वतीने सोमवार दि.२३ फेब्रुवारीपासून आझाद मैदानावर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.**




समाजाचे कार्यकर्ते दत्तात्रेय सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होत आहे. ‘कोळी’ नोंदीवरून जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सुलभरित्या मिळावेत, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. सुमारे ७० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या (पान २ वर)

# केरळचे नाव आता ‘केरळम’; केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

वृत्तसंस्था । तिरुअनंतपुरम

**केंद्र सरकारने केरळ राज्याचे नाव अधिकृतरित्या ‘केरळम’ असे करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. केरळ विधानसभेने हा प्रस्ताव सर्वानुमते पारित केला होता, त्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाने त्यावर शिक्कामोर्तब केले.**



राज्य सरकारचे म्हणणे आहे की ‘केरळम’ हे या प्रदेशाचे मूळ ऐतिहासिक आणि सांस्कृतिक नाव आहे. ब्रिटिश राजवटीत प्रशासकीय सोयीसाठी ते बदलून ‘केरळ’ असे करण्यात आले होते. मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी सांगितले की ‘केरळम’ हे नाव मल्याळम भाषा आणि परंपरांशी अधिक जवळचे असून ब्रिटिशकालीन बदल आता दुरुस्त केले जात आहेत. या मुद्द्यावर सत्ताधारी एलडीएफ आणि विरोधी भाजप एकमतावर आले आहेत.

# कांदा घसरला, शेतकरी संतापला सत्ताधाऱ्यांविरोधात आंदोलनाचे हत्यार

वृत्तसंस्था । नाशिक

**कांदा दरात दिवसेंदिवस घसरण होत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. मोठ्या कष्टाने पिकविलेल्या कांद्यास बाजारात अल्प दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. हा असंतोष आता विविध स्वरुपाच्या आंदोलनांच्या माध्यमातून बाहेर पडू लागला आहे.**




नाशिक जिल्हा हा कांदा उत्पादनासाठी प्रसिध्द आहे. त्यामुळे कांदा दरात घसरण झाल्यास आंदोलनाची पहिली ठिणगी नाशिक जिल्ह्यातच पडते. त्याचाच अनुभव पुन्हा एकदा आला आहे.

कांद्याच्या दरात झालेल्या मोठ्या घसरणीमुळे नांदगाव तालुक्यातील कांदा उत्पादक संतप्त झाले. शेतकऱ्यांनी नांदगाव - येवला मार्गावर ठिय्या दिला. रास्ता-रोको आंदोलनामुळे काही काळ वाहतूक कोंडी झाली.

सध्या कांद्याला प्रतिक्विंटल सरासरी ७०० ते १०५० रुपये इतकाच भाव मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली. बियाणे, खते, औषधे, मजुरी, वाहतूक यांचा वाढलेला खर्च लक्षात घेता मिळणारा दर हा अत्यंत कमी असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. परिणामी अनेक शेतकरी कर्जबाजारी होत असून आर्थिक संकटात सापडले आहेत. (पान २ वर)

# भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीत उत्तर महाराष्ट्रातून दिग्गजांना स्थान

## आ. मंगेश चव्हाण, भैरवी वाघसह पाच जणांना दिली मोठी जबाबदारी

प्रतिनिधी । जळगाव

**भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची घोषणा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केली आहे. नव्याने जाहीर करण्यात आलेल्या या कार्यकारिणीत राज्यातील विविध विभागांमधून एकूण ४३ जणांची विविध महत्त्वाच्या पदांवर निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या नियुक्त्यांमध्ये उत्तर महाराष्ट्रातून पाच जणांना महत्वपूर्ण स्थान देण्यात आले आहे.**



उत्तर महाराष्ट्र हा राजकीय दृष्ट्या अतिशय संवेदनशील आणि विविध सामाजिक समीकरणांनी व्यापलेला प्रदेश मानला जातो. अशा पार्श्वभूमीवर भाजपकडून माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, माजी खासदार डॉ. सुजय विखे आणि आमदार मंगेश चव्हाण यांसारख्या प्रभावी नेत्यांची प्रदेश पातळीवरील नियुक्ती महत्त्वपूर्ण ठरते. डॉ. पवार यांचा आदिवासी व ग्रामीण भागातील प्रभाव, सुजय विखे यांची युवा वर्गातील पकड आणि आमदार चव्हाण यांचा स्थानिक पातळीवरील जनसंपर्क यामुळे पक्ष संघटन अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. पैकी डॉ. पवार आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे यांची प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण, जळगावच्या खासदार स्मिता वाघ यांच्या कन्या भैरवी वाघ तसेच रोहिणी नायडू यांची प्रदेश चिटणीस म्हणून निवड करण्यात आली आहे.

नव्या प्रदेश कार्यकारिणीत उत्तर महाराष्ट्रातून केवळ पाच जणांना स्थान मिळाले आहे. मात्र, या पाचही जणांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्याने त्या भागासाठी हे प्रतिनिधित्व प्रभावी ठरणार असल्याची चर्चा आहे. डॉ. पवार यांचा आदिवासी व ग्रामीण भागातील प्रभाव लक्षात घेता त्यांची प्रदेश उपाध्यक्षपदावरील निवड पक्षासाठी महत्त्वाची मानली जात आहे. तर सुजय विखे यांना संघटनात्मक अनुभव आणि तरुण नेतृत्वाचा चेहरा म्हणून ही जबाबदारी देण्यात आल्याचे समजते. आमदार चव्हाण यांनी जळगाव जिल्ह्यात नुकत्याच पार (पान २ वर)

# शहादा पंचायत समितीतील कनिष्ठ सहाय्यक अडीच लाखांची लाच स्वीकारताना रंगेहात अटकेत

प्रतिनिधी । नंदुरबार

ग्रामसेवकाविरुद्ध सुरू असलेल्या चौकशीचा अहवाल त्याच्या बाजूने देण्यासाठी अडीच लाखांची लाच घेताना शहादा पंचायत समितीमधील कनिष्ठ सहायकाला अटक करण्यात आली आहे. नंदुरबार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने केलेल्या या कारवाईने लाचखोरांचे धाबे दणाणले आहे. या लाचखोरीची पाळेमुळे जिल्हा परिषदेच्या मुख्यालयापर्यंत पोहचण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा पंचायत समितीचे कनिष्ठ सहायक अभिजीत भावसार याला अडीच लाखांची लाच घेताना अटक करण्यात आल्याने चांगलीच खळबळ उडाली आहे. तक्रारदार हे दस्तुरखुद्द जिल्हा परिषदेचे सेवक असून ग्रामसेवक काथर्दे म्हणून कार्यरत असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा ठपका ठेवण्यात आला होता. त्यांची चौकशी तळोदा पंचायत समिती मार्फत करण्यात आली आहे. तो अहवाल मोघम असल्याने याबाबत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत स्पष्ट अभिप्राय मागितला होता. सदर चौकशीचे कामकाज (पान २ वर)

# जय महाराष्ट्र शासकीय कर्मचारी संघटनेतर्फे कामबंद आंदोलन

## सलग दुसऱ्या दिवशी कामकाज ठप्प ; जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । जळगाव

सन २००५ नंतर नियुक्त कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजना जशीच्या तशी लागू करा, चौथ्या वेतन आयोगापासून लिपिक वर्गीय संवर्गातील कर्मचारी यांची वेतन त्रुटी दूर करणे, लिपिक वर्गीय संघटनेची पदांची संख्या कमी न करता पदोन्नतीस्तर कमी करणे यासह विविध मागण्यांसाठी जिल्हा परिषदेच्या जय महाराष्ट्र शासकीय, निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेतर्फे कामबंद आंदोलन करण्यात आले. सलग दुसऱ्या दिवशी कामकाज बंद ठेवले. या आंदोलनास जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



जिल्हा परिषदेच्या जय महाराष्ट्र शासकीय, निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटना यांनी आवाहन केलेल्या व जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ, कास्ट्राईब कर्मचारी संघटना, कास्ट्राईब कर्मचारी कल्याण जिल्हा परिषद संघटना, कास्ट्राईब कर्मचारी कल्याण आरोग्य संघटना ह्या संघटनांनी पाठिंबा दिलेला आहे.

लिपिक वर्गीय संघटनेची पदांची संख्या कमी न करता पदोन्नतीस्तर कमी करा, लिपिक वर्गीय संवर्गांचे पदांची नामकरणे विकास अधिकारी व प्रशासन अधिकारी याप्रमाणे करा, २००५ नंतर नियुक्त कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजना जशीच्या तशी लागू करा, आदी प्रमुख मागण्यांसाठी जय महाराष्ट्र संघटनेचे जिल्हा पालक अध्यक्ष आर. टी. सोनवणे, जिल्हा परिषद संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रमोद काळे, उपाध्यक्ष राजू सोनवणे, सचिव पुरुषोत्तम पाटील, जिल्हा कोषाध्यक्ष गिरीश चौधरी, कार्यकारणी सदस्य गणेश पाटील, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पंकज पाचपोळ, जिल्हा संपर्कप्रमुख नदीम मिर्झा यांच्या नेतृत्वाखाली आज सलग दुसऱ्या दिवशी देखील जिल्हाभरातून या कामबंद आंदोलनास उस्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. त्यामुळे जिल्हाभरातल्या पंचायत समितीचे कामकाज ठप्प झाले आहे.

जिल्हा परिषद परिसरात लिपिक वर्गीय संवर्गातील सर्व जिल्हा परिषद कर्मचारी एकत्र येऊन मंडपात थाळी वाजवून, विविध घोषणांनी परिसराला दणाणून सोडले.

# अवैध वाळू उपशावर प्रांताधिकाऱ्यांचा छापा

प्रतिनिधी । जळगाव

**अवैध वाळू उपशावर आक्रमक भूमिका घेत प्रांताधिकारी विनय गोसावी यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन जळगाव तालुक्यातील वडनगरी येथे सकाळपासून खबरी ठेवत थेट नदीत उतरून मोठी कारवाई केली. वाळू काढण्यासाठी वापरण्यात येणारे यंत्र व दोर ताब्यात घेत अवैध उपसा उद्ध्वस्त केला.**

या कारवाईत प्रांताधिकारी विनय गोसावी, मंडळ अधिकारी छाया कोळी, ग्राम महसूल अधिकारी बडगुजर, महसूल सहाय्यक तेजस सपकाळे, वडनगरी पोलीस पाटील यांचा समावेश असलेल्या पथकाने अचानक छापा टाकला. तब्बल ३ तासांच्या प्रतीक्षेनंतर कारवाई पूर्ण करत दोर व इतर साहित्य नष्ट करण्यात आले.

जप्त केलेली सर्व यंत्रसामग्री प्रांताधिकाऱ्यांनी स्वतःच्या शासकीय वाहनातून प्रशासकीय इमारतीत जमा केली. पुढील कारवाईसाठी गावातील पोलीस पाटील व तरुणांना सतर्क राहण्याच्या सूचना देत, अवैध वाळू वाहतूक करणारी वाहने आल्यास तात्काळ कार्यवाहीचे नियोजन करण्यात आले आहे. अचानक आणि कठोर कारवाईमुळे परिसरात वाळू माफियांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. तसेच प्रशासनाच्या या धडक कारवाईने अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

## थोडक्यात

### विद्यापीठात राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**जळगाव ।** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बौद्धिक संपदा हक्क विभागामार्फत पारंपरिक ज्ञान संवर्धन आणि नवसंशोधनासाठी बौद्धिक संपदा हक्क या विषयावर दि.२६ फेब्रुवारी रोजी एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत भौगोलिक मानांकन क्षेत्रातील ख्यातनाम तज्ज्ञ ॲड. गणेश हिंगमिरे (पुणे), सुप्रसिद्ध लेखिका प्रा. मृदुला बेले (नाशिक), महाराष्ट्र राष्ट्रीय कायदा विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. प्रकाश चौधरी (मुंबई), बौद्धिक संपदा हक्क तज्ज्ञ डॉ. खुशबू भुरट (पुणे), श्री. दीपंकर रॉय (नवी दिल्ली) व संदीप सिंघल (नवी दिल्ली) उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

### बँड वाजवण्यास नकार दिल्याने बँड मालकाच्या डोक्यावर वार

**जळगाव ।** शहरातील मेहरुण परिसरात हळदीच्या कार्यक्रमादरम्यान वाजंत्री अचानक बंद केल्याच्या कारणावरून बँड मालकावर धारदार वस्तूने हल्ला केला. रामनगर येथे शंकर अशोक काळे याच्या हळदीच्या कार्यक्रमासाठी शिरसोली येथील अमोल लक्ष्मीकांत पवार यांचा बँड भाड्याने लावला होता. हळदीचा कार्यक्रम आटोपल्यानंतर पवार यांनी रात्री १० वाजेपर्यंतच कायदेशीर परवानगी असल्याने नियमानुसार बँड वाजविणे बंद केले. मात्र, नवरदेवासह त्याच्या मित्रांनी आग्रह धरल्याने वाद वाढला. या प्रकरणी नवरदेवासह तीन जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### हिंद दी चादर उपक्रमांतर्गत प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात

**जळगाव ।** मेहरूण येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयात हिंद दी चादर उपक्रमांतर्गत प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत इयत्ता पाचवी ते आठवीतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रश्नमंजुषेत गुरु तेग बहादुर यांच्या जीवनकार्यावर, राष्ट्रीय एकात्मता, भारतीय संस्कृती व सामान्य ज्ञान यावर आधारित प्रश्न विचारण्यात आले. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने उत्तरे देत आपले ज्ञान सादर केले. कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक मुकेश नाईक, पर्यवेक्षिका शितल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. दिनेश पाटील व साधना शिरसाट परीक्षक म्हणून काम पाहिले. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमामुळे वाचनाची आवड, विचारशक्ती व स्पर्धात्मक भावना वाढीस लागल्याचे मत शिक्षकांनी व्यक्त केले.

# भाजप महिला मोर्चाचे काँग्रेसविरोधात आंदोलन

प्रतिनिधी । जळगाव

• खा.राहूल गांधींचा नोंदविला निषेध

**जागतिक स्तरावर भारताच्या नेतृत्वाची दखल घेतली जात असताना आणि जागतिक एआय इम्पॅक्ट समिट सारख्या महत्त्वपूर्ण परिषदेत भारताच्या भूमिकेचे कौतुक होत असताना, काँग्रेस व युथ काँग्रेसच्या आंदोलनाविरोधात जळगावात भाजप महिला मोर्चाने तीव्र भूमिका घेत जाहीर निषेध आंदोलन छेडले. आंदोलनाच्या नावाखाली देशाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत खा. राहुल गांधी यांचा तीव्र निषेध करण्यात आला.**

जागतिक एआय इम्पॅक्ट समिट या आंतरराष्ट्रीय परिषदेत भारताने कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील आपली भक्कम भूमिका मांडत जागतिक समुदायाचे लक्ष वेधले आहे. भारत तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाच्या क्षेत्रात वेगाने पुढे जात असताना काही राजकीय पक्षांकडून आंदोलनाच्या माध्यमातून देशाची प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न होत असल्याची भावना भाजप महिला मोर्चाने व्यक्त केली. जग भारताकडे आशेने पाहत असताना देशांतर्गत राजकारणासाठी अशा प्रकारे




आंदोलन करणे ही देशविरोधी मानसिकता असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा, जळगाव महानगर यांच्या वतीने दि. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता कोर्ट चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासमोर जाहीर निषेध आंदोलन आयोजित करण्यात आले होते. या आंदोलनात घोषणाबाजी करत काँग्रेस व युथ काँग्रेसच्या भूमिकेचा निषेध करण्यात आला.

या आंदोलनात जळगाव मनपाच्या महापौर दीपमाला काळे, जिल्हा महिला मोर्चा अध्यक्षा नीतू परदेसी, महिला मोर्चा उपाध्यक्षा ज्योती बर्गे, नगरसेविका उज्ज्वला बेंडाळे, गायत्री राणे, प्रतीक्षा सोनवणे, वैशाली पाटील, तसेच सोशल मीडिया संयोजक पूनम तिवारी यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. याशिवाय छाया सारस्वत चिटणीस, मनीषा नाले, सुमन मराठे, विद्या पाटील, तृप्ती पाटील, नयना दुसाने आदी महिला कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला. भारतीय जनता पार्टी महानगर पदाधिकाऱ्यांमध्ये उदय भालेराव, विशाल त्रिफळी, नितीन इंगळे, राहुल वाघ यांची उपस्थिती होती.

युवा मोर्चा पदाधिकारी महेश पाटील, आकाश मोरे, हर्षल सिखवाल, अमित माळी, उन्मेष चौधरी, निलेश बाविस्कर, भूषण काकडे, हर्षल सोनवणे, अनुराज मराठे, हितेश वाणी आदी कार्यकर्तेही आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलन शांततेत पार पडले असून भविष्यात अशा प्रकारच्या कृतींना अधिक तीव्रपणे उत्तर दिले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

### लोकप्रतिनिधी खुर्चीवर विराजमान होताच नव्या पर्वाची सुरुवात

# नगरसेविका उज्ज्वला बाविस्कर यांनी प्रभागात केला पाइपलाइन कामाचा श्रीगणेशा

प्रतिनिधी । जळगाव

जळगाव महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक २ मध्ये पिण्याच्या पाण्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी नगरसेविका उज्ज्वला किशोर बाविस्कर यांनी नव्या पाइपलाइन कामाचा शुभारंभ केला.

चौघुले प्लॉट व ओक नगर परिसरात जुन्या पाइपलाइनमधून कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन नव्या पिण्याच्या पाइपलाइन टाकण्यास दि.२३ फेब्रुवारी रोजी प्रारंभ करण्यात आला. महानगरपालिका सदस्यपदाची धुरा स्वीकारताच उज्वला बाविस्कर यांनी विकासकामांना गती दिल्याने प्रभागातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

माजी नगरसेवक किशोर बाविस्कर यांनी सातत्याने पाठपुरावा करून या कामास मंजुरी मिळवून दिली होती. या कामाचे भूमिपूजन उज्ज्वला बाविस्कर यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आले.

यावेळी नगरसेवक सागर सोनवणे, नगरसेवक पीयुष कोल्हे, माजी नगरसेवक मुकुंदा सोनवणे, विनोद कोळी तसेच मनपा कर्मचारी व परिसरातील महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन पाइपलाइनमुळे परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



*• महापौर दीपमाला काळे यांनी मनपा कर्मचाऱ्यांची हजेरी घेतल्यानंतर महापालिकेतील कर्मचारी अधिकाऱ्यांनी सकाळी ९.४५ वाजेच्या आत कार्यालयीन वेळेत हजर रहावे, असे आदेश मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी नुकतेच बजावले आहे.*

# रोटरी क्लब जळगावची एआय कार्यशाळा : नवे तंत्रज्ञान प्रत्यक्ष शिकण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी । जळगाव

**रोटरी क्लब जळगावतर्फे व्होकेशनल महिन्यानिमित्त दैनंदिन जीवनातील एआयची उपयोगिता या विषयावर एका अभिनव व प्रात्यक्षिकाधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा पारंपरिक व्याख्यानापुरती मर्यादित न राहता प्रत्यक्ष अनुभवावर आधारित होती.**




प्रत्येक सहभागीने विविध एआय प्लॅटफॉर्म वर प्रत्यक्ष काम करत तंत्रज्ञानाचा अनुभव घेतला. कार्यशाळेत रजा अर्ज तयार करणे, प्रतिमांचे संपादन व गुणवत्ता सुधारणा, व्हिडिओ निर्मिती तसेच दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या विविध एआय साधनांचा वापर यांचे मार्गदर्शन करण्यात आले. सत्र अत्यंत संवादात्मक, उपयुक्त आणि डोळे उघडणारे ठरले. कार्यशाळेचे प्रभावी सादरीकरण प्रा. जयश्री पाटील आणि रेश्मा अत्तरदे यांनी पीपीटीच्या माध्यमातून केले. त्यांनी गुंतागुंतीच्या एआय संकल्पना अत्यंत सोप्या भाषेत आणि वापरण्यास सुलभ पद्धतीने समजावून सांगितल्या. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या पुढाकारामुळे व वैयक्तिक प्रयत्नांमुळे ही कार्यशाळा फलदायी ठरली. कार्यक्रमास रोटरी क्लब जळगावचे अध्यक्ष गिरीश कुलकर्णी, व्यावसायिक सेवा कमिटीचे चेअरमन राजेश वेद, माजी प्रांतपाल डॉ.चंद्रशेखर सिकची, राघवेंद्र काबरा, योगेश गांधी, डॉ. शुभदा कुलकर्णी, डॉ. सुनील सूर्यवंशी, डॉ. ज्ञानेश पाटील, नितीन काळुंखे, तसेच गांधी रिसर्च फाऊंडेशनचे दीपक मिश्रा, डॉ. चंद्रशेखर सिकची आदी उपस्थित होते.

# पोलीस कॉलनी परिसरात सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी गटारीचे तातडीने बांधकाम करा

• मनपा आयुक्तांना मनसेतर्फे निवेदन

प्रतिनिधी । जळगाव

शहरातील प्रभाग क्रमांक १८ मधील पोलीस कॉलनी परिसरात आजतागायत सांडपाणी निचऱ्यासाठी आवश्यक असलेली गटारीची कोणतीही व्यवस्था नाही. गेल्या पंधरा वर्षांपासून येथील सांडपाणी थेट रस्त्यावरून वाहत आहे. पोलीस कॉलनी परिसरात सांडपाणी निचऱ्यासाठी गटारीचे तातडीने बांधकाम करा, अशी मागणी मनपा आयुक्तांकडे मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

सद्यस्थितीत गटारीअभावी परिसरात डासांची उत्पत्ती वाढून मलेरिया, डेंग्यू यांसारख्या संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे. ही परिस्थिती नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेवर




थेट परिणाम करणारी आहे. पोलीस कॉलनीतील सर्व रहिवासी नियमितपणे मनपाचे कर भरत असूनही मूलभूत नागरी सुविधा मिळत नसल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कररूपाने संकलित होणारा निधी नागरिकांच्या मूलभूत सोयीसुविधांसाठीच वापरण्यात येणे अपेक्षित आहे, त्या अनुषंगाने संबंधित परिसराची तात्काळ पाहणी करून सांडपाणी निचऱ्याच्या समस्येचे वस्तुनिष्ठ परीक्षण करुन गटारीचे नवीन बांधकाम तातडीने करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेना व पोलीस कॉलनीतील सर्व रहिवाशांच्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी मनपा आयुकक्त ज्ञानेश्वर ढेरे यांना निवेदन दिले. यावेळी जिल्हाध्यक्ष ॲड.जमील देशपांडे, उपमहानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, ललित शर्मा, चेतन पवार, खुशाल ठाकूर, युसुफ खाटीक, शरीफ पिंजारी, जहांगीर पेंटर, अफजल इसाक खाटीक व पोलीस कॉलनी परिसरातील रहिवासी उपस्थित होते.

# जिल्ह्यासाठी मिळणार १७८ नवीन बसेस

## जळगावकरांचा प्रवास होणार सुकर; विभाग नियंत्रक दिलीप बंजारा यांची माहिती

प्रतिनिधी । विकास चव्हाण

**जळगाव जिल्हातील प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी आहे. वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, आता जळगाव जिल्ह्यासाठी १७८ नवीन बसेस उपलब्ध होणार आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातील या बसेस जळगाव जिल्ह्याला मिळणार असून शहरातील आणि ग्रामीण भागातील प्रवास अधिक सुकर होणार आहे.**



सुरक्षित आणि सोईचा प्रवास म्हणून अनेक जण महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळच्या बसेला प्राधान्य देतात. त्यात राज्य शासनाने एसटी बस प्रवाशांसाठी विविध सवलती आणि योजना सुरु केल्या आहे. ज्यामुळे प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. जिल्ह्यात वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता जळगाव एस.टी. विभागाने वाढीव बसची मागणी केली होती. त्यानुसार, या मागणीनुसार या बसेस जिल्ह्यात दाखल होणार आहे.

पूर्वी लक्झरी स्वरुपात २ बाय २ बसेस होत्या या बसमध्ये ५५ सीट्स होते. या बसेसमध्ये आसनांची संख्या कमी होती. परंतु आता ३ बाय २ बसमुळे आसन मुबलक प्रमाणात असणार असून ग्रामीण आणि निमशहरी भागातील प्रवाशांची उभे राहून प्रवासाची समस्या दूर होणार आहे.

नवीन बस आणल्याने गर्दीची समस्या कमी होईल आणि प्रवाशांना अधिक सोयीस्कर, आरामदायी आणि सुरक्षित प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. एकूणच, जळगावकरांसाठी ही नवी व्यवस्था प्रवासाचा अनुभव सुधारेल आणि एसटी प्रशासनाच्या सेवेत अधिक कार्यक्षमतेची हमी देईल. या नवीन बसेस ग्रामीण भागात, शहर ते जिल्ह्याच्या विविध ठिकाणावर धावणार आहे.

मार्च २०२६ मध्ये या बसेस जळगाव जिल्ह्याला उपलब्ध होणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे जळगाव विभाग नियंत्रक दिलीप बंजारा यांनी दै.शौर्य मराठीशी बोलताना दिली.

# पर्यावरण संवर्धनावर जनजागृती अभियान

प्रतिनिधी । जळगाव



**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावच्या विद्यार्थी विकास विभाग व के.सी.ई.सोसायटीचे व्ही. पी. होले शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पर्यावरण संरक्षण व संवर्धन जनजागृती अभियानउपक्रमानिमित्त पर्यावरण संरक्षण व संवर्धन काळाची गरज या विषयावर प्रा.संदीप केदार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.**

या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.केतन चौधरी व कार्यक्रम समन्वयक डॉ. संभाजी जमधडे व विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. आपल्या व्याख्यानात प्रा.संदीप केदार यांनी पर्यावरण संरक्षण व संवर्धन का गरजेचे आहे या विषयी सखोल माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रा. डॉ. संभाजी जमधडे यांनी केले.

# उनपदेव येथे भोंगऱ्या देवाचे पूजन

## आदिवासी बांधवांकडून गुलाल उधळत, श्रीफळ वाढवून दिले परिसरातील गावांना निमंत्रण

प्रतिनिधी । अडावद

**येथून जवळच असलेल्या उनपदेव येथे आदिवासी बांधवांच्या पारंपरिक उत्साहात भोंगऱ्या बाजाराची सुरुवात करण्यात आली. गुलाल उधळत भोंगऱ्या देवाचे पूजन करून श्रीफळ वाढवत विविध गावांना आमंत्रण देण्यात आले.**



पुढील संपूर्ण आठवडाभर परिसरातील विविध गावांमध्ये भोंगऱ्या बाजार भरणार असल्याची माहिती आयोजकांनी यावेळी दिली. सोमवार दि.२३ रोजी सकाळी १० वाजता उनपदेव येथील शरभंग ऋषी पाड्यावर ज्या ठिकाणी भोंगऱ्या बाजार भरणार आहे, त्या जागेवर भोंगऱ्या देवाची विधिवत स्थापना करण्यात आली. पुजारी भाया पावरा यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित भाविकांवर गुलाल उधळून 'गुलाल्या' साजरा करण्यात आला. पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशांचा निनाद आणि उत्साही वातावरणामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमास पोलीस पाटील देवसिंग पावरा, आदिवासी समाजसेवक संजीव शिरसाठ, विकासोचे माजी चेअरमन सचिन महाजन, वसंतराव देशमुख पतपेढीचे माजी चेअरमन मनोहर पाटील, पी. आर. माळी, जितेंद्रकुमार शिंपी, रफिक मण्यार यांच्यासह रायसिंग पावरा, रमेश बारेला, गजाराम पावरा, खुमसिंग पावरा, दिलीप बारेला, मधू भिल, गणदास बारेला तसेच महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. जगन महाराज यांच्यासह अनेक आदिवासी बांधवांनी कार्यक्रमात सहभाग घेतला.

### ➤ आदिवासी संस्कृतीचे दर्शन

**सातपुड्यासह इतर अन्य ठिकाणच्या तसेच मध्यप्रदेशातून आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी या भागात आलेले आदिवासी बांधव देहभान विसरून भोंगऱ्या बाजारात बेधुंदपणे नाचताना दिसून आले. सायंकाळी उशीरापर्यंत चाललेल्या या बाजारात आदिवासी शैलीतील खास ढोल वादन व बासरीच्या सुरांमुळे वातावरण निर्मिती झाली होती. जवळपास ५२ ढोल पथक सहभागी झाले होते. ढोलवादनाचे प्रथम तीन हजारांचे बक्षिस शेवरे पाडा येथील पथकाने पटकावले. सायंकाळी हजारो आदिवासी बांधवांनी एकमेकांना गुलाल लावून गुळ, फुटाणे, हार, कंगणच्या प्रसादाची देवाणघेवाण केली. यावेळी सर्वांनी ऐकमेकांची गळाभेट घेत आपापल्या पाड्या, वस्त्यांकडे प्रस्थान केले.**

# रासेयो शिबिरात संकलित दीड क्विंटल धान्याचे गरजू परिवारांना वाटप

● 'भगिनी मंडळ कला व वाणिज्य महाविद्यालयाचा सामाजिक उपक्रम

प्रतिनिधी । चोपडा




**भगिनी मंडळ कला व वाणिज्य महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभागाच्या वतीने दत्तक गाव निमगव्हाण (ता. चोपडा) येथे आयोजित विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात संकलित करण्यात आलेल्या दीड क्विंटल धान्याचे तीन गरजू परिवारांना वाटप करण्यात आले. हा उपक्रम कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राबविण्यात आला.**

या उपक्रमामुळे गरजू परिवारांच्या जीवनात आनंद निर्माण झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. यावेळी युवा उद्योजक आशिष गुजराथी, अध्यक्षा पूनम गुजराथी, सहसचिव अश्विनी गुजराथी, प्रभारी प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर, विभाग प्रमुख डॉ. संजय चौधरी, रासेयो कार्यक्रम अधिकारी सहा. प्रा.अनिल बाविस्कर, महिला कार्यक्रम अधिकारी सहा. प्रा. मोहिनी पाटील आदींसह स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

➤ शिबिरादरम्यान 'एक मूठ धान्य संकलन' अभियान हाती घेण्यात आले होते. स्वयंसेवकांनी गावातील प्रत्येक घरी जाऊन एक-एक मूठ धान्य गोळा केले. या उपक्रमातून गहू, तांदूळ, ज्वारी आदी धान्य मिळून सुमारे दीड क्विंटल धान्य संकलित झाले. संकलित धान्याचे दि.२४ फेब्रुवारी रोजी चोपडा शहरातील आदिवासी व मागासवर्गीय प्रवर्गातील तीन गरजू कुटुंबांना वाटप करण्यात आले.

## थोडक्यात

### बलवाडी विद्यालयात बक्षीस वितरण

**रावेर ।** तालुक्यातील निंभोरा बु. येथे वार्षिक बक्षीस वितरणासाठी मुख्याध्यापक एन. व्ही. पाटील यांनी २५ हजार रुपये, तर उपशिक्षक बी.बी. चौधरी यांनी पाच हजार रुपये देण्याचे मनोगतातून केले व्यक्त केले. बलवाडी (ता. रावेर) येथील श्री बाजीराव नाना पाटील टेक्नि. माध्यमिक विद्यालय व पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यामंदिर यातील वार्षिक शालेय सहशालेय स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ संस्थेचे अध्यक्ष गोपाल विठ्ठल पाटील यांच्या अध्यक्षतेत संपन्न झाला. सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन मान्यवरांनी केले.

# साकरे येथे समर्पण समारंभ भक्तिभावात साजरा

प्रतिनिधी । धरणगाव

**तालुक्यातील साकरे येथे आयोजित समर्पण समारोह अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. पुज्य आनंदजीवन स्वामी (कोठारी संत, खान्देश) व भक्तीसागर स्वामी (अध्यापक संत, सारंगपूर) यांच्या पावन उपस्थितीत हा सोहळा पार पडला.**



साकरे येथील शरद राजाराम गुजर यांचे ज्येष्ठ सुपुत्र पुष्पक यांचे स्वामिनारायण परिवारामध्ये समर्पण करण्यात आले. सोहळ्यादरम्यान संतांनी अध्यात्म, संस्कार आणि समाजप्रबोधन यावर मार्गदर्शन करत उपस्थितांना प्रेरणादायी विचार दिले. त्यांच्या प्रभावी वचनांनी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमास शिवसेना उपनेते गुलाबराव वाघ, बा.च.भाटिया हायस्कूलचे अध्यक्ष प्रा.डी.आर. पाटील, समरसता मंचचे प्रा.आर.एन.महाजन, धरणगावच्या नगराध्यक्षा लिला चौधरी, जानकीराम पाटील, दीपक सोनवणे, नगरसेवक भागवत चौधरी, राष्ट्रवादीचे मोहन पाटील, दिनेश पाटील, युवासेनेचे स्वप्नील परदेशी, शिवसेनेचे तालुकाप्रमुख जयदीप पाटील, अरविंद चौधरी, ज्येष्ठ शिवसैनिक अरुण पाटील, माधव पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी संतांचे विचार मनोभावे ऐकून सोहळ्याचे कौतुक केले. मान्यवरांचे स्वागत व सत्कार स्वामीनारायण परिवारातर्फे करण्यात आला. या समर्पण समारोहामुळे साकरे परिसरात उत्साह आणि भक्तिभावाचे वातावरण अनुभवायला मिळाले. उपस्थित भाविकांनी कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

# विवेकानंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची नावे चंद्रावर पाठवली जाणार

प्रतिनिधी । चोपडा

**येथील विवेकानंद विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अभिमानाचा क्षण ठरावा, अशी ऐतिहासिक संधी प्राप्त झाली आहे. शाळेतील इयत्ता सातवी बहिणाबाई वर्गातील ४९ विद्यार्थी तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक आणि इतर अनेक विद्यार्थ्यांची नावे थेट चंद्रावर पाठवली जाणार आहेत.**



अमेरिकेची आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन संस्था नासा यांच्या अर्टेमिस मोहिमेत या विद्यार्थ्यांचा 'व्हर्च्युअल गेस्ट' म्हणून सहभाग नोंदवण्यात आला आहे. नासाने दिलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत विद्यालयातील तंत्रस्नेही कलाशिक्षक राकेश विसपुते यांनी विद्यार्थ्यांची व शिक्षकांची ऑनलाईन नोंदणी केली होती. नोंदणी यशस्वी झाल्यानंतर नासाकडून सर्वांना अधिकृत 'बोर्डिंग पास' पाठविण्यात आले आहेत. या मोहिमेत सहभागींची नावे एका एसडी कार्डमध्ये संग्रहित करून ओरियन यानाद्वारे चंद्राकडे पाठवली जाणार आहेत. ही मोहीम केनडी स्पेस सेंटर येथून एप्रिल २०२६ पूर्वी प्रक्षेपित होणार आहे. अंतराळवीर चंद्राच्या पलीकडे सुमारे ६ लाख ८५ हजार मैलांचा प्रवास करून पॅसिफिक महासागरात परत येणार आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व अंतराळ संशोधनाबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. विकास हरताळकर, उपाध्यक्ष घनश्याम अग्रवाल, सचिव ॲड. रवींद्र जैन, सहसचिव डॉ. विनीत हरताळकर, मुख्याध्यापक नरेंद्र भावे तसेच शिक्षण विभागातील मान्यवरांनी सहभागी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# जिल्ह्यात विविध ठिकाणी संत गाडगे महाराज जयंती उत्साहात साजरी







शौर्य मराठी चमू

**जिल्ह्यात विविध शैक्षणिक, सामाजिक संस्थांकडून राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त समाज प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करीत ठिकठिकाणी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांना आदरांजली वाहण्यात आली.**

### पंकज माध्यमिक विद्यालय

**चोपडा –** राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त येथील पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात वृक्षारोपण व स्वच्छता अभियानासह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सामाजिक वनीकरण विभाग, चोपडा तसेच विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात सामाजिक वनीकरण विभागातील पदाधिकारी तुषार देवरे व इतर मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक व्ही.आर. पाटील यांनी गाडगेबाबांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित प्रसंग सांगत त्यांच्या कार्याची माहिती दिली. पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि प्लास्टिकमुक्त वसुंधरेसाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. सामाजिक वनीकरण विभागातर्फे विद्यार्थ्यांना रोपे भेट देण्यात आली. वनपरिक्षेत्र अधिकारी सविता सोनवणे, वनपाल तुषार देवरे, रविंद्र भामरे, अस्मिता पगार, वनरक्षक सुवर्णा कुंभारे, कविता पाटील, जयश्री धनगर, गुणवंत देसले, दीपक कोळी, अंकुश भिल आदींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी परिसरात स्वच्छता अभियान राबविले. इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विजया पाटील, पौर्णिमा भादले, वैशाली पाटील, विक्रम निकम, पी.जे.पाटील, वेलसिंग बारेला, विजय सोनवणे, किशोर पाटील आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन विजया पाटील यांनी केले. कार्यक्रमाची सांगता 'गोपाला गोपाला, देवकीनंदन गोपाला' या भजनाने करण्यात आली.

### त्रिरत्न बुद्ध विहार

**निंभोरा बुद्रूक –** निंभोरा बुद्रूक (ता. भुसावळ) येथे त्रिरत्न बुद्ध विहारात राष्ट्रीय संत गाडगे महाराज यांची जयंती स्वच्छता अभियान व अभिवादन कार्यक्रमाने उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात विहार परिसरात स्वच्छता अभियान राबवून करण्यात आली. ग्रामस्थ व कार्यकर्त्यांनी परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प केला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय बौद्ध महासभा महिला विभागाच्या राज्य संघटक लता तायडे, मीरा नरवाडे, दिनेश इखारे, रमेश खंडारे तसेच संयुक्त जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रकाश सरदार उपस्थित होते. लता तायडे यांनी आपल्या मनोगतात संत गाडगे महाराज यांच्या समाजप्रबोधन कार्याचा गौरव करताना सांगितले की, संत गाडगे महाराज यांनी आयुष्यभर समाजातील घातक परंपरा, रूढी व अंधश्रद्धांविरोधात भजनाच्या माध्यमातून जनजागृती केली. त्यांचे विचार आजच्या पिढीने आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. कार्यक्रमास सुमेध कांबळे, अजय वाघ, प्रणव मेश्राम, शुभम खंडारे, विशाल मेश्राम, तरुण गवई, निखिल मेश्राम आदींची उपस्थिती होती. यावेळी जयंती उत्सव समितीच्या वतीने त्रिरत्न बुद्ध विहारास संत गाडगे महाराज यांची प्रतिमा सप्रेम भेट देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश सरदार यांनी केले.




### नागलवाडी येथील माध्यमिक विद्यालय व सामाजिक वनीकरण परीक्षेत्र

**चोपडा –** तालुक्यातील नागलवाडी येथील माध्यमिक विद्यालय व सामाजिक वनीकरण परीक्षेत्र, चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. संत गाडगेबाबा यांनी आयुष्यभर स्वच्छता, समाजप्रबोधन आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश दिला. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेत विद्यार्थ्यांनी शाळा परिसरात स्वच्छता अभियान राबविले. विद्यार्थ्यांनी वर्गखोल्या, शाळेचे आवार व परिसर स्वच्छ करून स्वच्छतेचा संदेश दिला. यानंतर पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. लावलेल्या रोपांचे संगोपन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वीकारली. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक पी.डी.पाटील, सर्वशिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सामाजिक वनीकरण परीक्षेत्र, चोपडा यांच्या अधिकारी श्रीमती सविता सोनवणे, वनपाल तुषार देवरे, रवींद्र भामरे, अस्मिता पगारे, सुवर्णा कुंभार, जयश्री धनगर, कविता पाटील, लिपिक गुणवंत देसले तसेच वनसेवक अंकुश भिल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण झाली असून परिसरात सकारात्मक संदेश पोहोचला आहे.

### पिंप्री खुर्द ग्रामपंचायत

**धरणगाव –** तालुक्यातील पिंप्री खुर्द येथील ग्रामपंचायतीच्या सभागृहात संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. ग्रामपंचायतीच्या वतीने गाडगे महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी गाडगे महाराजांनी दिलेल्या स्वच्छता, सामाजिक समता आणि अंधश्रद्धा निर्मूलनाच्या संदेशाचे स्मरण करण्यात आले. उपस्थितांनी त्यांच्या विचारांचे आचरण करण्याचा संकल्प व्यक्त करत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने कार्य करण्याची भावना व्यक्त केली. 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' हा संदेश कृतीतून राबविण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला. कार्यक्रमास सरपंच कमलताई धोबी, उपसरपंच धनराज मनोरे, ग्रामसेवक मुरलीधर उशीर तसेच सदस्य मंगल पाटील, शांताराम मोरे, सुनील बडगुजर, नाना बडगुजर, रुक्सानाबी खाटिक, सरला लोखंडे, सरला बडगुजर, अनुसया सोनवणे व छाया मोहकर उपस्थित होते. तसेच ईश्वर धोबी, शिवाजी महाजन, आबा धोबी, मनोज पांडे, मोहन शिंदे, गौतम दोडे, सिराज कुरेशी, रमेश पांडे, बाबूलाल बडगुजर आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमाच्या शेवटी गाडगे महाराजांच्या आदर्शांचा अंगीकार करून स्वच्छता, सामाजिक बांधिलकी आणि सद्भाव जपण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.